स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड वाणिज्य विद्याशाखे अंतर्गत पीएच.डी साठी, प्रस्तूत करावयाचा संशोधन आराखडा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

"नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्प (PoCRA) योजनेचे बीड जिल्हयातील आर्थिक व्यवस्थापन व विकासातील योगदान - एक अभ्यास"

: संशोधक :

श्री. श्रीपाद पुष्करराव कदम

(एम.कॉम., एम. एस. डब्ल्यू., सेट,)

: मार्गदर्शक :

डॉ. अशोक दौलतराव चव्हाण

सहाय्यक प्राध्यापक,

ले. रमेश वरपुडकर महाविद्यालय,

सोनपेठ, जि. परभणी

: संशोधन केंद्र :

स्कूल ऑफ कॉमर्स ॲण्ड मॅनेजमेंट

स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

प्रस्तावना :-

उपलब्ध सांख्यिकीय आकडेवारी चा अभ्यास केल्यास असे लक्ष्यात येते की महाराष्ट्र राज्य हे निव्वळ लागवड क्षेत्र व लोकसंख्या याबाबत महाराष्ट्र हे देशात दुसऱ्या स्थानी आहे. महाराष्ट्र राज्यातील पन्नास टक्क्यांहून अधिक लोकसंख्या ही कृषि क्षेत्रावर अवलंबून आहे. राज्यातील कृषि क्षेत्राचा विकास सर्वस्वी अनियमित पावसावर अवलंबून असल्यामुळे त्यात मोठे चढ उतार दिसून येतात. महाराष्ट्र शासनाने वातावरणीय बदल कृती आराखडा तयार केलेला असून त्यामध्ये हवामानातील दीर्घकालीन संभाव्य प्रतिकूल परिणामांचा वेध घेतलेला आहे. सदर आराखड्यामध्ये कृषि व जल क्षेत्रावर होणाऱ्या परिणामांचा उहापोह करून त्यास सामोरे जाण्यासाठी उपाय योजना सुचविण्यात आलेल्या आहेत. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची सरासरी जमीनधारणा ही 1.44 हेक्टर असून यामध्ये अत्यल्प व अल्प भूधारकांचे प्रमाण जास्त आहे. बहुतांश शेतकऱ्यांकडे शेतीत आवश्यक गुंतणुक करण्यासाठी पुरेसे भांडवल नसते तसेच ते मुलभूत सुविधांपासून वंचित असतात. या शेतकयांना हवामानातील दीर्घकालीन प्रतिकूल बदलाचा आघात पेलण्यासाठी आवश्यक हवामान अनुकूल बी-बियाणे, कृषि विस्तार सेवा, कृषि हवामान विषयक सल्ला तसेच काढणीपश्चात पायाभूत सेवा-सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाहीत. पूर्णा नदीच्या खो-यातील जमिनीमधील क्षारांचे अतिरिक्त प्रमाण व क्षारयुक्त भुजल यामुळे तेथील कृषि उत्पादनावर विपरीत परिणाम झालेला आहे.

जागतिक परिस्थितीचा विचार केला तर आपल्या असे लक्षात येते की हवामान बदलामुळे अनेक समस्या उद्भवलेल्या आपल्याला पहायला मिळतात शेती व शेतीशी संबंधीन घटकावर खूप मोठा परिणाम होत असलेला आपल्याला पहायला मिळतो. ज्यामुळे शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर आर्थिक पिछेहाट झालेली आपल्याला पहायला मिळते. याचा परिणाम पुर्ण जगाबरोबर आपल्या महाराष्ट्र राज्यावर सुध्दा झालेला आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील काही ठराविक भागावर याचा जास्त परिणाम आपल्याला पहायला मिळतो. मग या भागातील निवडक जिल्ह्यातील शेतकऱ्यांना हवामान बदलांमुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास सक्षम करणे आणि शेती व्यवसाय किफायतशीर करण्यास सहाय्य करणे या उद्देशाने या प्रकल्पाचे काम चालत आहे.

महाराष्ट्रातील 15 जिल्ह्यांमधील 5142 गावांचा समावेश या प्रकल्पामध्ये करण्यात आलेला आहे. सदर गावाची निवड लघुपाणलोट आधारित करण्यात आलेली आहे. हवामान बदलास असुरक्षितता, संवेदनशीलता आणि बदलत्या हवामानाशी जुळवून घेण्याची क्षमता यांच्या एकत्रित निर्देशांकानुसार गाव समुह निश्चित करण्यात आले आहेत. लघुपाणलोटाचे सरासरी क्षेत्र सुमारे 5000 हेक्टर एवढे असून यामध्ये सरासरी ७ ते ८ गावांचा समावेश आहे.

नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्प (PoCRA)

जागतिक बँक सहाय्यित हवामान अनुकूल कृषी प्रकल्पास (PoCRA-पोकरा) यापुढे नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प म्हणून संबोधण्यात यावे म्हणून १७ जानेवारी, २०१७ रोजी शासननिर्णय निर्गमित करून योजनेचे नाव बदलण्यात आले. त्यानुसार महाराष्ट्र शासनांतर्गत या प्रकल्पाशी निगडित सर्व कार्यालयीन कामकाजासाठी यापुढे नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प या नवीन नावाचा वापर सुरु झाला.

कै. चांडिकादास अमृतराव देशमुख उर्फ नानाजी देशमुख, समाजसेवक, यांनी भारतातील विविध राज्यातील दुर्गम पहाडी गावातील शेतकऱ्यांना विविध प्रकल्पांच्या माध्यमातून आत्मनिर्भर, उद्योगाशील बनवण्यामध्ये आपले जीवन समर्पित केले. त्यांनी ग्रामविकास व लोक शिक्षण गोवंश संवर्धन, पारंपारिक कृषी पद्धतींचा विकास व प्रसार, कृषी सिंचन तसेच जलसंधारणाच्या माध्यमातून कृषी सिंचन क्षेत्रात वाढ करणे इत्यादी विविध समाजोपयोगी कार्यात भरीव योगदान दिलेले आहे. श्री. नानाजी देशमुख यांनी केलेली निस्वार्थ समाजसेवा व त्यांचे कृषी क्षेत्रातील योगदान लक्षात घेऊन जागतिक बँके सहाय्यीत हवामान अनुकूल कृषी विकास प्रकल्प श्री. नानाजी देशमुख यांच्या नावे राज्यातील विदर्भ व मराठवाड्यातील १५ अतिसंवेदनशील दुष्काळ भागात सुरू करण्यात आला. या प्रकल्पास पूर्वी हवामान कृषी प्रकल्प (PoCRA) असे संबोधण्यात येत होते.

ग्राम कृषी संजीवनी समिती प्रशिक्षण :

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत राबविल्या जाणाऱ्या विविध योजना आणि त्याबाबत गावपातळीवर सर्व योजनांचे योग्य नियोजन करून प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने प्रकल्पामध्ये निवड झालेल्या गावांच्या ग्रामपंचायती मध्ये ग्राम कृषी संजीवनी समिती स्थापन करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे संबंधित जिल्हा स्तरावरून प्रकल्पाचे नियंत्रण व समन्वय साधण्यासाठी स्वतंत्र समिती गठीत करण्यात आलेली आहे. त्याचबरोबर, मुंबई येथे प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (Project Management Unit) याची स्थापना करण्यात आली आहे. ग्राम कृषी संजीवनी समिती मध्ये प्रशिक्षणाचेही व्यवस्थापन करण्यात आले.

बीड जिल्हयाची माहिती :

भौगोलिक पार्श्वभूमी प्रस्तूत संशोधनाचा विषय "नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्प (PoCRA) योजनेचे बीड जिल्हयातील आर्थिक व्यवस्थापन व विकासातील योगदान - एक अभ्यास" हा आहे. बीड जिल्हा हा महाराष्ट्र राज्याच्या साधारणपणे मध्य भागी येतो.

जिल्हयाचे मुख्य ठिकाण	- बीड
क्षेत्रफळ	- 10693 चौ. कि.मी.
भौगोलिक स्थान (अक्षांश रेखांश)	18.3 ते 19.3 उत्तर अक्षांश 74.5 ते 76. पूर्व रेखांश
हवामान	- उष्ण व कोरडे
तापमान	- सरासरी 20 ते 40 से
पर्जन्यमान	- 65 सेमी (सरासरी)
लोकसंख्या	- 25,85,962 (सन 2011 च्या जनगण गजेनुसार)
तालुके	- एकुण ११ तालुके गेवराई, आष्टी, केज, माजलगाव, पाटोदा, धारूर, परळी, शिरुर कासार, बीड, वडवणी. अंबाजोगाई.

हवामान व पर्जन्य -

हवामानाच्या दृष्टीने वर्षाचे तीन भाग पडतात. जून ते सप्टेंबर या महिन्यात हवा उष्ण असली तरी पावसाळी वातावरणामुळे त्यात थोडासा गारवा असतो. ऑक्टोबर ते फेब्रुवारी या महिन्यात हवा कोरडी व थंड असते. नोव्हेंबर ते जानेवारी या महिन्यात अधून-मधून कांही दिवस थंडीची लाट येते. मार्च ते मे महिन्यात हवामान उष्ण व कोरडे असते. जिल्हयातील पावसाचे प्रमाण बरेच कमी असून तो वेळेवर पडत नाही आणि त्यामुळे जिल्हयात अधून-मधून दुष्काळी परिस्थिती निर्माण होते. जिल्ह्यात सर्वसाधारणपणे दरवर्षी जूनच्या दुसऱ्या पंधरवाडयापासून पावसाला सुरुवात होते व तो सप्टेंबर अखेर राहतो. कधी कधी ऑक्टोंबर महिन्यात सुध्दा पाऊस पडतो. जिल्हयात पावसाचे सरासरी प्रमाण 666.36 मि.मी. आहे. साधारणपणे जिल्ह्यात आष्टी, पाटोदा, शिरुर कासार , बीड, केज, धारुर या तालुक्यात पावसाचे प्रमाण जिल्हयाच्या सरासरीपेक्षा कमी तर गेवराई , माजलगाव, वडवणी, परळी व अंबाजोगाई तालुक्यात पावसाचे प्रमाण जिल्हयाच्या सरासरीपेक्षा जास्त असते. जिल्हयात 2015-16 मध्ये पावसाचे सरासरी प्रमाण 407.11 मि.मी. होते. वर्ष 2015-16 मध्ये जिल्हयात गेवराई, शिरुर कासार, आष्टी, पाटोदा, या तालुक्यात पावसाचे प्रमाण बरेच कमी आहे. जिल्ह्यात वर्ष 2015-16 च्या जिल्हा सरासरीपेक्षा एकही तालुक्यात अधिक पाऊस पडला नसून सर्व तालुक्यात वर्ष 2015-16 च्या जिल्हा सरासरीपेक्षा कमी पाऊस पडला आहे. वर्ष 2015-16 मध्ये जिल्हयात सर्वाधिक पाऊस वडवणी तालुक्यात तर सर्वात कमी पाऊस गेवराई तालुक्यात पडला आहे

व्यवसाय :

जिल्हयातील लोकांचा शेती हा प्रमुख व्यवसाय असून बहुतांश शेती पावसावर अवलंबून आहे. बीड जिल्ह्यात उद्योग धंद्याचा अभाव आहे. कोरडवाहू जमिनीचे प्रमाण जास्त आहे. पावसाचे प्रमाण कमी आहे. म्हणून दार हेक्टरी उत्पन्न कमी आहे. बहुसंख्य शेतकरी वर्षातून एकच पीक घेतात. पावसाच्या लहरीपणामुळे उत्पन्नाची हमी नाही, त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडतो.

बीड जिल्हा हा ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. त्यामुळे जिल्ह्यातून मोठया प्रमाणावर मजुरांचे स्थलांतर होत असते. ते स्थलांतर करणारे मजूर हे भूमिहीन व अल्पभूधारक आहेत. हे कामगार मागासवर्गीय किंवा खालच्या जातीतील असतात. गावामध्ये रोजगार न मिळाल्यामुळे त्यांना ऊस तोडणीसाठी

स्थलांतर करावे लागते. व त्यांना अत्यंत अल्प वेतन मिळते, त्यामुळे त्यांची आर्थिक परस्थिती बिकट आहे.

जिल्हयात सिंचन पद्धतीत आणखीन सुधारणा झालेली नाही. बहुसंख्य लोक पारंपारिक सिंचन पद्धतीचा वापर करतात. त्यांचा आधुनिक सिंचन पद्धतीचा वापर वाढला पाहिजे. तसेच जिल्यातील शेवटच्या शेतकऱयाला त्याचा हक्काचे लाभ मिळाले पाहिजेत. किंवा सरकारने शेतकऱ्याच्या हिताचा विचार करावा यासाठी जिल्यात अनेक शेतकरी आंदोलने देखील होतात आणि त्यात शेतकऱ्यांचा मोठया प्रमाणात सहभाग असतो.

बीड जिल्हयाचा बहुतांश भाग दुष्काळी असल्यामुळे येथील लहान शेतकऱ्यांची परिस्थिती बिकट आहे. तसेच खत, बियाणे व औषधांचा वाढलेला भरमसाठ खर्च व कुटुंबाची न पेलवणारी जबाबदारी - या संकटात सापडलेले बरेच शेतकरी आत्महत्येचा मार्ग अवलंबतात. परंतु त्यानंतरही त्यांच्या कुटुंबाची आर्थिक विवंचना फार मोठ्या प्रमाणात पाहायला मिळते. या सगळ्या परिस्थितीवर मात करण्याचा एक उपाय म्हणून सरकार मार्फत वेगवेगळ्या योजनांची अंमलबजावणी केली जाते. त्यापैकीच एक योजना रोजगार हमी योजना जिच्या मार्फत अनेक भूमिहीन शेतमजूर व अल्पभूधारक शेतकऱ्यांना काही प्रमाणात रोजगार उपलब्ध होऊन संसाराचा गाडा चालवण्यास हातभार लागत आहे.

जमिनीचा प्रकार :

हा सर्व जिल्हा काळ्या थरांच्या दगडांच्या प्रदेशात पसरला आहे. जिल्हयातील गेवराई आणि (माजलगाव तालुक्यातील गोदावरी काठाची जमीन खोल काळी असून शेतीस चांगली आहे. बाकीच्या तालुक्यातील जमिनी पातळ थराच्या व खडकाळ आहेत. जिल्हयात खरीप आणि रबी ही दोन पिके घेतली जात असली तरी माजलगांव व गेवराई तालुक्यात रब्बीचे प्रमाण जास्त आहे. दिवसेंदिवस पर्जन्यमान कमी होत असल्याने भूगर्भातील पाण्याची खोली खाली जात असून 300 फुटापर्यंत पाणी लागत नाही. सर्व तालुक्यात विहिरीचे पाणी शेतीस मोठया प्रमाणावर वापरतात.

संशोधनाचे उद्देश :

१. बीड जिल्हयाचे आर्थिक आणि सामाजीक विश्लेषण करणे.

२. बीड जिल्हा आणि पोखरा योजना जिल्हयातील शेतकऱ्यांसाठी कशी . आवश्यक आहे याचा आढावा घेणे.

३. बीड जिल्हयातील सदरील प्रकल्पाच्या लाभार्थ्यांचा अभ्यास करणे.

४. पोखरा योजनेचा लाभार्थ्यांच्या आर्थिक आणि सामाजीक जिवनमानावर झालेला प्रत्यक्ष परिणाम तपासणे.

गृहितके :

१. हवामान बदलामुळे बीड जिल्हयाच्या बहुतांश भागात अवर्षण प्रवण क्षेत्र तयार झाले आहे.

२. हवामान बदलामुळे शेती उत्पादनावर परिणाम होतो.

३. हवामान बदलामुळे पाऊस अनिश्चित झाला आहे.

४. बीड जिल्हयातील बहूसंख्या लोक शेतीवर अवलंबुन आहेत.

५. बीड जिल्हयातील शेतकरी आर्थिकदृष्ट्या सधन नाही.

६. बीड जिल्हयातील शेतकऱ्यांना मिळणारे अनुदान हे पुरेशे नाही.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधन विषयाचा अभ्यास विश्लेषनात्मक संशोधन पद्धतीच्या आधारे करण्यात येणार आहे. या संशोधनामध्ये संख्यात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग केला आहे.

नमुना निवड :

प्रस्तुत संशोधनासाठी "नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्प (PoCRA) योजनेचे बीड जिल्हयातील आर्थिक व्यवस्थापन व विकासातील योगदान - एक अभ्यास" हा संशोधन विषय निवडला आहे व सदरील संशोधनासाठी प्राथमिक आणि दुय्यम स्रोतांच्या माध्यमातून माहिती संकलन करण्यात येईल. व संकलित माहितीचा आधार घेऊन गैरसंभाव्यता नमुना निवड (Non Probability of Sampling) प्रकारातील सोईस्कर नमुना निवड पद्धतीनुसार (Convenience sampling Method) माहितीचे संकलन करून संशोधनातील तथ्यांचे वर्गीकरण, माध्ये आणि सहसंबंध सदरील संशोधनात करण्यात येईल. त्याप्रमाणे नमुना निवड म्हणून प्रस्तुत संशोधनात बीड जिल्हा है अध्ययन क्षेत्र निवडले आहे. बीड जिल्ह्यामध्ये एकूण ११ तालुके आहेत. या संशोधनामध्ये संपूर्ण बीड जिल्ह्यातून लाभार्थी वर्गनिहाय सोईस्कर पद्धतीने वर्गीकरण करून ६२६ लाभार्थी नमुना निवड म्हणून अभ्यासासाठी घेण्यात येणार आहेत व त्यांच्या स्थितीचा अभ्यास करण्यात येणार आहे.

माहिती संकलन :

"नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्प (PoCRA) योजनेचे बीड जिल्हयातील आर्थिक व्यवस्थापन व विकासातील योगदान - एक अभ्यास" या संशोधन विषया अनुषंगाने तथ्य संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा उपयोग केला जाणार आहे.

१) प्राथमिक स्त्रोत / साधने

प्रस्तुत संशोधनासाठी बीड जिल्ह्यातील नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्प (PoCRA) योजनेच्या विविध लाभार्थ्यांच्या संदर्भात प्रत्यक्ष सर्वेक्षण , मुलाखती व प्रश्नावली पद्धतीतून तथ्य संकलित केले जाणार आहे . यांचा प्राथमिक स्त्रोत / साधने म्हणून उपयोग करण्यात येणार आहे.

२) दुय्यम स्त्रोत :

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने प्रकाशित व अप्रकाशित साधने शोधनिबंध ग्रंथ , लेख, मासिके, पाक्षिके, वर्तमानपत्रे व इंटरनेट वेबसाईट इ. स्त्रोतांचा उपयोग तथ्यसंकलनासाठी करण्यात येणार आहे.

माहितीचे पृथ्थकरण :

माहितीचे पृथ्थकरण करून त्यावर विविध सांख्यीकिय साधनांच्या सहाय्याने माहितीचे विश्लेषण व सादरीकरण केले जाईल.

प्रकरणाची रूपरेषा :

१. प्रस्तावना

२. संशोधन साहित्याचा आढावा

३. बीड जिल्हयाचे सामाजीक आणि आर्थिक समालोचन

४. पोखरा योजनेचे बीड जिल्हयातील शेतक-यांच्या आर्थिक आणि सामाजीक जिवनावरील परिणाम

५. निष्कर्ष आणि अभिप्राय

६. संदर्भ सूची

संदर्भसूची :

1. mahapocra.gov, in

2. beed.gov.in

3. ए. डी. कदम - बीड जिल्ह्याचा विकासाची दिशा.

4. व्ही. एस. पालवे - बीड जिल्ह्यातील ऊस तोडणीसाठी स्थलांतर केलेल्या कामगारांचा अभ्यास.

5. शिंदे मदन - आधुनिक सिंचन पद्धतीचे कृषी विकासातील योगदान, बीड जिल्ह्याचा अभ्यास.

6. अमर हबीब - बीड जिल्ह्यातील शेतकरी आंदोलन.

7. माणिक चव्हाण - ग्रामीण विकासात रोजगार हमी योजनेची भूमिका, बीड जिल्ह्याचा अभ्यास.

8. सतीश गव्हाणे - बीड जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबाच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास.

9. World Bank (2004), 'India: Re-energizing the Agricultural sector to sustain Growth and Reduce poverty, Report Available at: < http://go.worldbank.org/BYTZWW8H00>

10. Kekane M.A (2013), India Agriculture status, Importance and Role in Indian Economy international Journal of Agriculture and Food science. Technology, revived by Research India publications, ISSN 2249-3050, volume 4, PP. 343-346.

11. मनोज आवळे (2013) शेतक-यांसाठी अर्थसाहायच्या व अन्य विविध योजना' सन चौधरी लॉ पब्लिशर्स जळगाव, पुणे

12. सुचिता देशपांडे (2019) शेतकरी आज ही आर्थिक पारतंत्र्यातच ! ओ. आर. एफ. मराठी

13. Agriculture census 2010-11, Maharashton state report on number of area and operational holding 2014.

14. The state of sudian Agriculture 2012-13, Department of Agriculture & cooperation, ministry of Agriculture, Government of India

15. Annual Report 20210 2012, Department of Agriculture and cooperation, ministry of Agriculture Government of India, Retrieved on 22/04/2013 from www.agricoop.nic.in

16. Kothari CR (2012). Research methodology methods and Techniques, New Age International, New Delhi.

17. Directorate of Economics and Statistics, ministry of Agriculture. http://www.important posted on 30 June 2015

संशोधक

श्री. श्रीपाद पुष्करराव कदम

(एम.कॉम., एम. एस. डब्ल्यू. सेट,)

मार्गदर्शक

डॉ. अशोक दौलतराव चव्हाण

सहाय्यक प्राध्यापक,

ले. रमेश वरपुडकर महाविद्यालय,

सोनपेठ जि. परभणी